ट्रेड शासन
२६
१

पत्र

प्रति
सर्व जिल्हाधिकारी.,

क्रमांक:पीओजेस. १०८३/५७७/विका१. स्वाते,

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ३/१/१९८४.

विषय:-स्वा. सैनिकांच्या पश्चात त्यांच्या विधवांना राज्यशासनाचे पेन्शन मंजूर करण्याबाबत.
संदर्भ:- शासन निर्णय, सा. प्र. वि. क्रमांक:पीओजेस. १०८३/५७७/विका१. स्वाते, दि. ३.८.८३.

वरील शासन निर्णयानुसार स्वा. सैनिकांच्या पश्चात त्यांच्या विधवांना पेन्शन देण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आलेले आहेत, त्या संबंधी काही मुद्दे उपस्थित करण्यांत आलेले आहेत. ते मुद्दे व त्यावरील खुलासा खालीलप्रमाणे करण्यांत येत आहे.

| मुद्दा | खुलासा |
|---|---|
| १. विधवांना देण्यात येणारे पेन्शन १.८.८३ पासून द्यावयाचे काय ? १.८.८३ पूर्वी स्वातंत्र्य सैनिक मृत्यु पावला असेल तर काय करावयाचे ? | १. स्वा. सैनिकांच्या पश्चात त्यांच्या विधवांना पेन्शन देण्याचे अधिकार दिनांक १.८.८३ पासून जिल्हाधिका-यांना दिलेले आहेत. त्यानुसार [१] शासन निर्णय, सा. प्र. वि. क्रमांक:पीओजेस. १०८२/विका१. स्वाते दि. १फेब्रुवारी, ८२ नुसार पेन्शनसाठी पात्र असलेल्या स्वा. सैनिकाला पेन्शन दिले गेलेले नसेल तर त्याच्या पश्चात त्याच्या विधवेला दि. १.२.८२ पासून १५०/-रु. द. म. प्रमाणे पेन्शन देण्याची कार्यवाही करावी. [२] पेन्शन घेत असलेला स्वा. सैनिक मृत्यु पावला असेल तर त्याच्या मृत्युच्या दिनांकापासून त्याच्या विधवेला पेन्शन देण्यात यावे. |

..२..

स्वा. सैनिकाच्या मागे दोन विधवा असतील तर काय करावयाचे ?

२. दोन्ही विधवा स्वा. सैनिकाच्या कायदेशीर पत्नी असतील तर त्यांना पेन्शनची रक्कम समप्रमाणात वाटून द्यावी.

संबंधीत शासन निर्णयाची अंमलबजावणी दि. १.८.८३ पासून व्हावी असे शासनात आहे. विधवांचे अर्ज दि. १.८.८३ पूर्वी असतील तर जिल्हाधिकाऱ्यांनी करावयाचे काय ?

३. १.८.८३ रोजी ते अर्ज अनिर्णीत असतील तर त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घेण्यास हरकत नाही. [कृपया वरील [१] पहावे.]

. केंद्रशासनाचे पेन्शन घेणाऱ्या स्वा. सैनिकाच्या पश्चात त्याला देण्यात येणारी राज्यशासनाची पेन्शन त्याच्या विधवेला पुढे चालू ठेवायची कीं, तिला केंद्रशासनाचे पेन्शन मंजूर होईपर्यन्त प्रकरण प्रलंबित ठेवावे का ?

४. स्वा. सैनिकाला केंद्रशासनाची पेन्शन मिळत असेल व नियमाप्रमाणे राज्यशासन पेन्शन द्. म. रु. १००/-प्रमाणे मिळत असेल तर स्वा. सैनिकाच्या पश्चात त्याच्या विधवेला केंद्रशासनाचे पेन्शन चालू होण्याची वाट न पहाता स्वा. सैनिकाला मिळत असलेले राज्यशासनाचे १००/-रु. द्. म. प्रमाणे पेन्शन चालू ठेवण्यात यावे.

शासनाने मंजूर केलेल्या प्रकरणांत पुन: पेन्शन दिले जाणार नाही याची दक्षता घेण्याची सर्व जिल्हाधिकाऱ्यांना विनंती करण्यांत येते.

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिति, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, सर्व जिल्हा गौरव समिती यांना माहितीसाठी अग्रेषित.
निवड फाईल, विका. स्वा. सै. कक्ष.